# भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास,

राळेगणसिद्धी, ता. पारनेर, जि. अहमदनगर, 414302.

## सदस्य नोंदणी अर्ज

पूर्ण नावः ..............................

संपूर्ण पत्ताः ..............................

जिल्हाः

तालुकाः

पिनकोडः

लिंगः स्त्री/पुरुष

जन्मतारीखः

शिक्षणः ..............................

मोबाईल नंबरः

इमेल आयडीः

व्यवसायः ..............................

वार्षिक सरासरी उत्पन्नः

आवडीचे क्षेत्रः ..............................

सामाजिक प्रार्श्वभूमिः ..............................

केलेल्या किंवा करीत असलेल्या सामाजिक कामाचा तपशीलः ..............................

स्वतःशी संबंधित संस्थेचे नाव व कार्य परिचयः ..............................

भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे सदस्य होण्याचा उद्देशः ..............................

भ्रष्टाचार विरोधी चळवळ अधिक बळकट करण्याविषयी आपले विचारः ..............................

मी खाली सही करणार सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे पूर्णतः सत्य असून ती खोटी किंवा चुकीची आढळून आल्यास मी होणाऱ्या कायदेशीर कारवाईस पात्र राहीन याची मला पूर्ण कल्पना आहे. मी वरील संघटनेचा सदस्य असताना कोणतेही बेकायदेशीर कृत्य करणार नाही. संघटनेने ठरवून दिलेल्या आचारसंहितेचे पूर्णतः पालन करीन. तसेच मा. अण्णासाहेब हजारे यांच्या आदर्श विचारांचे अनुकरण करू समाज व देशाची सेवा करून आणि संघटनेच्या माध्यमातून होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमात व चळवळीत शांततापूर्ण व अहिंसक मार्गाने सक्रीय सहभाग घेईन. मी स्वतः भ्रष्टाचार करणार नाही व इतरांनाही भ्रष्टाचारापासून रोखण्याचा प्रयत्न करीन. मी माझे विचार व आचार यात अंतर पडू देणार नाही तसेच संघटनेच्या किंवा मा. अण्णासाहेब हजारे यांच्या नावाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष गैरवापर करणार नाही.

आपला विश्वासू,

..............................

(100 रुपयांच्या स्टँप पेपरवर आवश्यक)

# प्रतिज्ञापत्र

पूर्ण नावः

संपूर्ण पत्ताः

तालुकाः जिल्हाः पिनकोडः

मोबाईल नंबरः

मी स्वखुशीने सत्य प्रतिज्ञेवर असे लिहून देतो की, समाज व राष्ट्रप्रेमाने प्रेरित होऊन सेवाभावी वृत्तीने सामाजिक काम करणे आणि अन्यायाच्या विरोधात शांततापूर्ण मार्गाने अहिंसक संघर्ष करण्याच्या हेतुने मी ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाच्या चळवळीत सहभागी होऊ इच्छितो. या चळवळीत सहभागी होताना मला जन आंदोलनाची आचारसंहिता, शर्ती व अटी, नियम पूर्णतः मान्य असतील व जनांदोलनाचे सदस्यत्व मिळाल्यास मी खालील अटींचे काटेकोर पालन करीन.

1) मी मा. अण्णासाहेब हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाच्या सर्व उपक्रमात, आंदोलनात व इतर चळवळीत शांततापूर्ण, अहिंसक व सनदशीर बाबींचे पालन करून सक्रीय सहभाग घेईन.
2) मी शपथेवर कथन करतो की, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचा सदस्य झाल्यानंतर मी भविष्यात कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य होणार नाही, कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध ठेवणार नाही व कोणत्याही राजकीय पक्षाद्वारे कोणतीही निवडणूक लढविणार नाही.
3) मी माझ्या जीवनात मा. अण्णासाहेब हजारे यांनी सांगीतलेल्या शुद्ध विचार, शुद्ध आचार, निष्कलंक जीवन, अपमान पचवण्याची शक्ती आणि जीवनात शक्य तेवढा त्याग या पंचसूत्रीचे अधिकाधिक पालन करण्याचा प्रयत्न करीन आणि सर्वांशी सेवाभावी वृत्तीने वागेन.
4) मी शपथेवर असेही कथन करतो की, मी माझ्या जीवनात कोणत्याही परिस्थितीत मा. अण्णासाहेब हजारे यांच्या नावाचा किंवा त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापित संघटनेचा अथवा संघटनेच्या कोणत्याही दस्तऐवजाचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष गैरवापर करणार नाही. माझ्याकडून तसे घडल्यास होणाऱ्या कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे.
5) मी माझ्यासाठी जगत असताना माझे गाव, माझा समाज व माझा देश यासाठी शक्य तितका वेळ देण्याचा प्रयत्न करीन.
6) मी कोणत्याही परिस्थितीत स्वतः भ्रष्टाचार करणार नाही तसेच इतरांना भ्रष्टाचार करण्यापासून रोखण्याचा शांततापूर्ण व अहिंसक मार्गाने प्रयत्न करीन.
7) मी संघटना अधिक मजबूत करण्याचा, संघटनेचे सदस्य वाढविण्याचा आणि संघटनेच्या माध्यमातून मा. अण्णासाहेब हजारे यांचे ग्रामविकास, पाणलोटक्षेत्र विकास, भ्रष्टाचार विरोधी जनजागृती यासह संघटनेच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीन.

मी खाली सही करणार वरील प्रतिज्ञापत्र कोणत्याही दबावाला बळी न पडता स्वखुशीने लिहून देत आहे.

स्वाक्षरी

पूर्ण नाव